● मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७४ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू; 'दादांचा वादा'

### प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने पत्रकार व वृत्तपत्रांच्या विविध मागण्यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माहिती व जनसंपर्क खाते आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी येथे दिले आहे. विविध कार्यक्रमानिमित्त जालना दौऱ्यावर असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सोमवार (दि २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने 'चित्रकुट' भास्कर आबा दानवे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांना आश्वस्त केले.

प्रसंगी गेल्या अडीच वर्षांपासून वृत्तपत्रांची पडताळणी शासकीय बैठकी अभावी रखडली, दर दोन वर्षांनी दरवाढ अपेक्षित असतांना गेली सहा वर्षात एकदाही दरवाढ नाही, ग्रामीण भागातील पत्रकारांना बस पास अथवा ग्रामीण पत्रकारांसाठी अधिस्विकृती पत्रिकेसाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट रद्द करणे, वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यासह अन्य मागण्यांसंदर्भात निवेदन दिले. उपमुख्यमंत्री यांनी काही मिनीटात विषय समजुन घेत हा विषय माहिति व जनसंपर्क मंत्रालयाचा असून मुख्यमंत्री महोदयांकडे हे खाते आहे. त्यामुळे त्यांच्यांशी चर्चा करु प्रश्न मार्गी लावू असा वादा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केला. प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाच्यावतीने भेटलेल्या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सुहास वैद्य, आमेर खान, नरेंद्र जोगड यांचा समावेश होता.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही. राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा-सात वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, झाली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, या महत्त्वाच्या विषयासह पुढील मुद्यांवर आपल्या स्तरावरुन तातडीने निर्णय घेऊन वृत्तपत्रे व पत्रकारांना न्याय द्यावा.

शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत प्रत्येकवेळी भेदभाव केल्या जात आहे. प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या जाहिराती ह्या मोठे, मध्यम संवर्गासह लघु संवर्गातील दैनिकांना दिल्या जातात. मात्र, लघु संवर्गातील साप्ताहिकांना टाळल्या जात आहे. मे. साहेबांना विनंती आहे की, शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.६ या मुद्द्यात बदल करून सर्व संवर्गातील दैनिक-साप्ताहिक वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. तसेच मागील वर्षभरात शासनमान्य यादीवरील लघु संवर्गातील साप्ताहिकांचा अनुषेश भरुन द्यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.९ या मुद्यानुसार शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना रंगीत जाहिराती, पहिले पान, विशेष पान, नाविन्यपूर्ण जाहिराती देण्यात याव्यात. शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.१०



यानुसार दर दोन वर्षांनी दरवाढ करण्याचे आदेश आहेत. ४.५.२ मध्ये नमुद कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे वाढीव दर देण्यात यावे. ( कारण- गेल्या सहा वर्षांपासून एकदाही दरवाढ करण्यात आली नाही.) शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.१ नुसार शासनाच्या अधिनस्त मंडळ-महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्य संस्था आदींना लघु संवर्गातील साप्ताहिकांना जाहिरात देण्याचे बंधनकारक करावे.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी. शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.५ मध्ये बदल करून भुसंपादनाच्या जाहिराती ह्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना प्रसिद्धीस देण्यात याव्यात. तसेच विभागीय माहिती उपसंचालकांकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीत लघु संवर्गातील साप्ताहिकास किमान एक जाहिरात देण्यात यावी., शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.७ मध्ये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात ९ व एक ऐच्छिक जाहिरात देण्यात येत आहे. यात सुधारणा करण्यात यावी. व एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात. यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (२५ डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, विजयादशमी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.८ नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी., शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.१२ नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात. एका आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या जाहिराती ह्या ४०० चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात. साप्ताहिकांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान ५ व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी., ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात. शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान ३० दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी. या मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर पीसीएमचे राज्यसरचिटणीस महेश जोशी, जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची स्वाक्षरी आहे.

युवा आदर्श

### ठपका ...

तपास यंत्रणा सज्ज
तो डामडौल भपका
गाडीभर कागद पत्रे
न पुराव्यांचा झपका
छोट्या प्याद्यां वरती
सहज ठेवति ठपका
काळीकुट्ट कारस्थाने
पुसा टिंबाचा ठिपका
गुन्हा घेई अंगावरती
भला होगा रे सबका
आपण चालवे गाडी
गरिबा माथी पाप का
नगाला नग मिळाला
फोडता निष्पाप का
विकतघेई माणूसकी
दयामाया ना चाबका
मूळ गुन्हेगार मोकाट
पोलीसालागे धापका
व्यवस्थेत अस्वस्थता
कु कृत्या ना चाप का
सही सलामत सुटलो
तरी येई ना झोप का
मनात लपला गुन्हेगार
स्वता करालं माफ का

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दोष, चुकीच्या सवयी बदलणे म्हणजेच अपग्रेट होणे - राधाकृष्णजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** वाईटपणा किंवा दोष बदलणे म्हणजे त्यात सुधारणा करणे, त्याला चांगल्या दिशेने नेणे म्हणजेच स्वतः ला अपग्रेड करणे आहे. मात्र, चांगल्या गोष्टींमध्ये बदल करणे म्हणजे त्यांचा दर्जा घसरवणे किंवा त्यांना हानी पोहोचवणे, म्हणजेच डाऊनग्रेड करणे होय. दोष किंवा वाईटपणाला दूर सारून स्वतःला चांगल्या पातळीवर नेणे आणि चांगल्या गोष्टींना वाईटपणाकडे नेऊन डाऊनग्रेड होण्यापासून वाचवणे हे आपल्या कृतींचे उद्दिष्ट असले पाहिजे, असा मौलिक तसेच जीवनात परिवर्तन घडविणारा उपदेश गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी केला.

श्रीमद भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने भोकरदन रोडवरील ब्रजधाम येथे सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथेच्या अनुषंगाने विविध विषयांवर प्रबोधन केले. याप्रसंगी प्रसिद्ध भजनसम्राट प. पू. इंद्रेशजी महाराज, ह. भ. प. नाना महाराज, प. पू. मनोज महाराज गौड, प. पू. शिवम जी महाराज यांची उपस्थिती होती. याप्रसंगी राधाकृष्णजी महाराज म्हणाले की, ईश्वराप्रती भाव जागृत झाल्यास ते आपल्या हृदयात विराजमान होतात. अशावेळी आपण योग्य आहोत की नाही याचादेखील ते विचार करत नाहीत. जीवनात संपत्ती, पैसा, भौतिक सुविधा हे सुख देऊ शकत नाही. त्यातून मिळणारे सुख अल्पकाळ टिकणारे असते. याउलट, प्रभू भक्तीतच खरे सुख सामावलेले आहे. भक्ती हृदयात असावी. ती हृदयातच प्रफुल्लित होते. दिखाऊपणासाठी केली जाणारी भक्ती निरार्थक असते. भक्ती दांभिक नसावी. करण भक्ती आणि प्रेम ही दिखाऊपणाची बाब नाही. मोठा टिळा लावल्याने अथवा वेगळा पोशाख परिधान करण्याने कोणी भक्त बनू शकत नाही. अनेकजण तर भक्तीचा भाग म्हणून घर- संसाराचा भाग त्याग करतात. घर सोडून गेल्यास पूजापाठ, नैवेद्य, ईश्वराला शृंगार कसा मिळणार? तुमची भक्ती कशी सार्थक ठरणार, असा प्रश्न उपस्थित करून कथा श्रवणाचा उद्देश तुम्हाला महाराज बनवण्यासाठी नाही तर सेवेचे माध्यम बनवून आपल्या संस्काराद्वारे घराला वृंदावन बनवणे हा त्यामागील उद्देश आहे. ईश्वराची उदारता अद्भुत आहे. जीवमात्रांवर कृपा करण्यासाठी ते निरंतर उदार असतात. ईश्वराची कृपा समजून घेतली तर खूप सुख मिळते. कृपा अनुभूती हीच जीवन आहे. नेते मंडळी जेथे कोठे जातात, तेथे मतदार निर्माण करतात. मात्र, भगवान श्रीकृष्ण जिथे जातात तिथे मित्र बनवतात. भक्त नव्हे. संत जीवांना भक्त, गुरु हे दास बनवतात. मात्र, भगवान श्रीकृष्ण आहे जीवांना मित्रवत स्वीकारतात. डॉक्टर अथवा वैद्य हे नाडी परीक्षा आणि चाचण्यांवरून तनस्थिति जाणून घेतात. मात्र, गुरु हे नाडी न बघता भक्तांचा चेहरा बघून मनस्थिती ओळखतात. गुरुतत्त्व हे जागृत असून, गुरुतत्त्वामुळे माणूस मनस्थिती समजू लागतो. त्यामुळेच गुरुला आईचा दर्जा दिला गेला आहे, असे राधाकृष्ण महाराजांनी सांगितले.

यावेळी प. पू. इंद्रेशजी महाराज यांनी उपस्थित भक्तांना मार्गदर्शन करून भजने गाऊन मंत्रमुग्ध केले. त्यानंतर संकीर्तन व मुख्य यजमान शिवरतन मुंदडा व दैनिक यजमानांच्या हस्ते आरती झाली.




भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उद्या मंगळवार दि. २१ जानेवारी रोजी रात्री आठ वाजता राधाकृष्णजी महाराज हे युवा संवाद या उपक्रमांतर्गत युवकांशी संवाद साधून प्रबोधन करणार आहेत. यावेळी प्रश्न उत्तरेही होणार आहेत.

## लाडकी बहिण योजना बंद होणार नाही - उपमुख्यमंत्री अजित पवार

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जालना जिल्हा कार्यालयाचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** ज्या महिलांचे अडीच लाख रुपयांच्या आत उत्पन्न आहे त्यांना आपण लाडकी बहीण योजनेचा लाभ देत आहोत, ही योजना बंद होणार नसल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे दिला. सोमवार (दि २०) रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जालना जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन सोहळ्या प्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती



होती.

पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, लाडकी बहिण योजना बंद होणार नाही, जी महिला इन्कम टॅक्स भरत असेल, ६५ हजारांचा पगार घेत असेल, त्या महिलेसाठी लाडकी बहिण योजना नाही असेही **पान २ वर**



**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय जनता पक्षाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष भास्कर दानवे पाटील यांच्या 'चित्रकुट' निवासस्थानी भेट दिली. यावेळी दानवे परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी प्रतीक दानवे, सुशीलाताई दानवे, डॉ सौ उत्कर्षा व चिरंजीव समरजीत दानवे आदी. (छाया - अनिल व्यवहारे)**

## संपादकीय

### ... कार्यक्रमाचे राजकियकरण

महिलांचा हळदी कुंकू समारंभ हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. विशेषतः मकर संक्रांतीनंतर हळदी कुंकू समारंभ मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. या निमित्ताने महिला आपले दुःख विसरून एकत्र येतात. वान म्हणून एकमेकांना भेटवस्तू देतात. या निमित्ताने विविध सामाजिक संदेश दिला जातो. पण हल्ली हळदी कुंकू समारंभ देखील इतर सणांप्रमाणेच इव्हेंट बनला आहे. अलीकडे तर या सार्वजनिक हळदी कुंकू समारंभाचे पेवच फुटले आहे. विशेषतः यातले ९० टक्के हळदी कुंकू समारंभ हे राजकीय स्वरुपाचे किंवा त्या हेतूने प्रेरित असल्याचे दिसून येते. ज्या शहरात किंवा गावात निवडणुका असतात तिथे तर हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. स्थानिक नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य असे कार्यक्रम करण्यात अग्रेसर असतात. यावर्षी ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका आहेत त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात हळदी कुंकू समारंभ आयोजित केले जात आहेत. या निमित्ताने उपस्थित महिलांना भेटवस्तूंचे वाटप राजकिय नेते करत आहेत. हळदी कुंकू समारंभ हे एकप्रकारे राजकीय शक्ती प्रदर्शनाचे आणि प्रचाराचे माध्यम बनत आहे. राजकीय नेत्यांनी आयोजित केलेले हळदी कुंकू समारंभ हे महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी आयोजित केले जातात. एरव्ही या महिलांना कोणी विचारतही नाही. आज ज्याप्रमाणे राजकीय नेत्यांनी दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव यासारख्या सार्वजनिक उत्सवात अतिक्रमण करून या उत्सवांचा इव्हेंट बनवला आहे. त्याचीच पुनरावृत्ती हळदी कुंकू समारंभात होताना दिसत आहे. निखळ, कौटुंबिक आणि सांस्कृतिक स्वरूपातील या कार्यक्रमाचा नवरात्र, गणेशोत्सव व नवरात्र उत्सव यासारखा राजकीय आणि बाजारू वापर केला जात आहे. राजकीय नेते यातून आपला राजकीय मतलब साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय नेत्यांनी महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी हळदी कुंकू समारंभाचा वापर करण्याऐवजी महिलांचे प्रश्न सोडवावेत म्हणजे राजकीय नेत्यांना अशा सार्वजनिक कार्यक्रमाचा वापर करण्याची गरज पडणार नाही आणि हळदी कुंकू सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अवमूल्यन देखील होणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### लाडकी बहिण योजना ...

यावेळी उपमुख्यमंत्री पवारांनी स्पष्ट केले. ज्या महिलांचं अडीच लाख रुपयांच्या आत उत्पन्न आहे त्यांना आपण लाडकी बहीण योजनेचा लाभ देतो. दोन दिवसांपुर्वीच ३ हजार ७०० कोटींचा चेक महिला बाल विकास खात्याला दिला आहे. काही महिलांच्या बँक खात्यात योजनेचे पैसे यायला सुरुवात झाली असून उर्वरित महिलांच्या खात्यातही लवकरच पैसे येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मराठा महासंघाने अजित पवार यांना काळे झेंडे दाखवून नोंदविला निषेध





**जालना । प्रतिनिधी -** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि गँगवारमुळे बीड जिल्हा भययुक्त बनलेला असताना, राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जनतेचा प्रचंड रोष असताना, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःकडे पालकमंत्रीपद घेऊन, परिस्थिती निवळल्यानंतर धनंजय मुंडे यांच्याकडे पालकमंत्री पद देण्याची खेळी आखल्याचे दिसून येत आहे, असा आरोप करत अखिल भारतीय मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी जालना दौऱ्यादरम्यान अजित पवार यांना काळे झेंडे दाखवत जोरदार निषेध नोंदवला.

या आंदोलनात मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, मंगेश मोरे आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नवीन मोंढा रोड येथे सकाळपासून कार्यकर्ते झेंडे दाखवायचा तयारीत होते. परंतु, पोलीस यंत्रणा या सर्व गोष्टींमुळे मागावर होती. मात्र, कार्यकर्त्यांनी हुलकावणी देत गनिमी काव्याने वेगवेगळ्या ठिकाणी थांबून काळे झेंडे दाखवलेच.

अरविंद देशमुख म्हणाले की, आमचा कोणत्या पक्षाला, सत्ताधारी अथवा विरोधकांना नव्हे तर प्रवृत्तीला विरोध आहे. धनंजय मुंडे नेतृत्व करत असलेल्या बीड जिल्ह्यात वाढलेल्या गुन्हेगारी कारवायांविषयी अरविंद देशमुख आणि कार्यकर्त्यांनी तीव्र रोष व्यक्त केला. बीड जिल्हा आधीच विविध प्रकारच्या गुन्हेगारीमुळे भययुक्त झालेला आहे. अशा परिस्थितीत, अजित पवार यांनी पालकमंत्री पद स्वतः कडे ठेवले असून, नंतर पुन्हा हे पद धनंजय मुंडे यांच्याकडेच दिले जाणार असल्याचे स्पष्ट दिसते. पालकमंत्री पद घेऊन कर्तव्याचा आव आणत अजित पवार आहे हे बीड जिल्ह्यात एक दोन ठिकाणी रेड करतील. पुन्हा जसे तसेच घडणार म्हणजेच जैसे थे परिस्थिती उद्भवणार, हे स्पष्ट आहे. त्यामुळे जिल्ह्यात शांतता निर्माण होण्यासह जनतेच्या मनात सुरक्षिततेची आणि भयमुक्त भावना निर्माण व्हावी, या दृष्टीने दुसऱ्या पक्षातील नेत्याला पालकमंत्री पद दिले जावे, अशी मागणी महासंघाने केली.

अजित पवार हे पुणे जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी कारवायांवर व कोयता गँग, वाळू गँग, भूखंड माफिया आणि जमीन लुटणाऱ्या टोळ्यांच्या कारवायांवर कारवाई करण्यात ते अपयशी ठरले आहेत, असे महासंघाने म्हटले आहे. धनंजय मुंडे हे कृषिमंत्री असताना वाल्मीक कराड याने हार्वेस्टर खरेदी प्रकरणात सोलापूर, बार्शी, पंढरपूर परिसरातील १४० शेतकऱ्यांकडून प्रत्येकी ८ लाख रुपये घेतल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली. जोपर्यंत हे प्रकरण निकाली लागत नाही, तोपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रीपद दिले जाऊ नये, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे. अजित पवार यांच्यावर केवळ औपचारिक दौरे करत वेळ घालवत असल्याचा व दोन-चार ठिकाणी केवळ वेळ घालवून धनंजय मुंडे आणि इतर नेत्यांना पाठीशी घालण्याचे काम करत आहेत, असा आरोप मराठा महासंघाने केला आहे.



**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी राज्यमंत्री आमदार अर्जुन रावजी खोतकर यांच्या दर्शना निवासस्थानी भेट दिली. खोतकर परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, अनिरुद्ध खोतकर, चक्रधर खोतकर, संजय खोतकर, अभिमन्यू खोतकर, अभिषेक खोतकर, सौ सीमा खोतकर, सौ रचना खोतकर, सौ योगिता खोतकर व ज्ञानेश्वर डोंगरे छायाचित्रात दिसत आहे. (छाया अनिल व्यवहारे)**

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या माध्यमातून मयताच्या वारसास दोन लाखाचा धनादेश



**जालना । प्रतिनिधी -** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेली प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही सर्वसामान्य जनतेसाठी मोलाची ठरत आहे. याच योजनेच्या माध्यमातून डोक्यावरचे छत हरवलेल्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा हात पुढे केला जातो. अशाच पध्दतीने सावरगाव हडप येथील कैलासवासी परमेश्वर बाबासाहेब शिंदे यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने दोन लाखाचा धनादेश सोमवार दि. २० जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता देण्यात आलाय.

सावरगाव हडप येथील रहिवासी कै. परमेश्वर बाबासाहेब शिंदे यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यामुळे त्याच्या वारसदार पत्नी सौ. मंगलबाई परमेश्वर शिंदे यांना महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या राम नगर शाखेने हा धनादेश प्रदान केलाय. दरम्यान महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांच्या हस्ते हा धनादेश प्रदान करण्यात आलाय. यावेळी बँक अधिकारी दादाराव जाधव, रोखपाल राजेश कोळेकर, कर्मचारी भिमराव आढाव, संतोष जाधव यांची उपस्थिती होती.

संकट काळात मदत करण्यासाठी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही महत्वाची ठरते, त्यामुळे सर्वांनी या विमा योजनेचा लाभ घेतला पाहिजे असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केलंय.

# माऊली ग्रुप तर्फे महिला वर्गाचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहत

**मंठा । प्रतिनिधी -** माऊली ग्रुप तर्फे महिला वर्गाचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहत. मकर संक्रात निमित्त हजारो महिलांच्या घेतला हळदी कुंकवाचा आनंद नव वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांती होय. हिंदू धर्मात मकर संक्रांतीचा सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो.या सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी महिलावर्ग सनई चौघडा लावून कुंभाराकडे वाजत गाजत जात अवा लुटण्याचा आनंद व शहरातील प्रत्येक घरोघरी जाऊन हळदीकुंकू वाण देऊन तिळगुळ घ्या गोड गोड बोला शुभेच्छा देऊन या सणाचा आनंद उत्सव साजरा करत होत्या.

मात्र आता बदलत्या काळानुसार महिलावर्ग ग्रुप बनवून हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवून वान देण्याचा कार्यक्रम ठेवत आहेत. याविषयी सविस्तर वृत्त आशि की पहिली महिला मकर संक्रात निमित्त प्रत्येक घरोघरी जाऊन हळदी कुंकू लावून तिळगुळ घेऊन मकर संक्रात निमित्त शुभेच्छा देत होत्या. आता बदलत्या काळानुसार महिला ग्रुप बनवून हळदी कुंकवाचा कार्यक्रम व वान देण्याचा कार्यक्रम ठेवत आहेत.आज (ता.१९) रविवार रोजी शहरातील मार्केट यार्ड मधील माऊली ग्रुप मधील महिला वर्गाणी एकत्र येऊन हळदी कुंकाचा व वान देण्याचा कार्यक्रम ठेवला होता.

यात शहरातील हजारो महिलांनी या हळदीकुंकवाच्या व वान देण्याच्या कार्यक्रमात सहभाग घेऊन मकर संक्रांतीचा आनंद उत्सव साजरा केला. यावेळी माऊली ग्रुपच्या सदस्या डॉ.रूपाली सरकटे, शकुंतला निर्वळ, सुमित्रा भावसार, गयाबाई शेंद्रे, राखी भावसार,हेमा चकला, रेणुका खरात,वैशाली बरसाले, वैशाली राठोड, पूजा वाघमारे,सीमा निर्वळ, छाया निर्वळ, मंदोदरी बरसाले, आरती खराबे,अर्चना राठोड, स्वाती चव्हाण, डॉ. ऐश्वर्या निर्वळ यांनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



नववर्षातील एकमेव मकर संक्रात हा सण महिलासाठी विशेष असतो नव वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांती होय. हिंदू धर्मात मकर संक्रांतीचा सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो. या सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी महिलावर्ग शहरातील प्रत्येक घरोघरी जाऊन हळदीकुंकू वाण देऊन तिळगुळ घ्या गोड गोड बोला शुभेच्छा देऊन या सणाचा आनंद उत्सव साजरा करतात अशी प्रतिक्रीया डॉ. रुपाली सरकटे यांनी व्यक्त केली.

## कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करा

### वंचित बहुजन माथाडी कामगार युनियनची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार यांनी कामात हलगर्जीपणा केल्यामुळे विद्युत प्रवाह कमी-जास्त झाला आणि अनेकांच्या घरातील उपकरणांचे नुकसान झाले. शिवनगर व समर्थनगर भागात विद्युत प्रवाहाचा अनेक दिवसांपासून कमी-अधिक होण्याच्या अडचणी येत असल्याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार यांच्यावर कारवाई करत त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्यावतीने जिल्हाधिकारी व विद्युत वितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, शिवनगर येथे १७ ऑक्टोबर २०२३ रोजी संध्याकाळी ७.३० ते १० वाजेच्या दरम्यान विद्युत प्रवाह कमी जास्त झाल्यामुळे या भागातील नागरिक खूप त्रस्त आहे. विद्युत प्रवाह अनेक दिवसांपासून कमी अधिक होत आहे. यामुळे शिवनगर व समर्थनगर भागातील विद्युत उपकरणे खराब होत आहेत. असे असून देखील अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार व त्यांचे अन्य साथीदार हे सर्व या भागात दुर्लक्ष करीत आहेत. त्यांच्या निष्काळजीपणामुळे जनतेच्या घरात असलेली उपकरणे जसे की, टीव्ही, फ्रीज इतर वस्तुंचे हजारों रुपयांचे नुकसान होते आहे. अशा हलगर्जी करणारे अधिकारी व त्याचे सोबत असलेले कर्मचारी यांची तात्काळ बदली करण्यात यावी, यांचा चालु असलेला भ्रष्टाचार व लाचखोरी तात्काळ बंद करावी, अन्यथा वंचित बहुजन माथाडी कामगारच्यावतीने निदर्शने, मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला. निवेदनावर नितीन गोटीराम उपर्वट यांची स्वाक्षरी आहे.

# प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक

## उपमुख्यमंत्री अजित पवार; स्थानिक हॉस्पीटलचे लोकार्पण संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** आज प्रत्येक व्यक्तीला आपल्या दैनंदिन आयुष्यात प्रचंड धावपळ करावी लागत आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

येथील स्थानिक हॉस्पीटलच्या लोकार्पण कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार हे बोलत होते. यावेळी आमदार अर्जून खोतकर, खा. कल्याण काळे, आ. विक्रम काळे, आ. सत्यजीत तांबे, आ. मनोज कायंदे, डॉ. राजीव डोईफोडे, माजी आमदार राजेश टोपे, माजी आ. अरविंद चव्हाण, सतिष चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.


यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, एखादी व्यक्ती जर शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या फिट असेल तरच त्या व्यक्तीला निरोगी म्हटले जाते. सद्या वाढत असलेल्या विविध आजार, बदलती जीवनशैली यामुळे कोणत्याही वयोगटातील लोकांना कोणतेही आजाराला सामोरे जावे लागत आहे. तसेच सर्वांनी व्यसनापासून दूर राहावे असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. त्याकरीता सर्वांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या आरोग्याची कशाप्रकारे घेतात याचे देखील यावेळी उदाहरण दिले. आरोग्याच्या सुविधा देणाऱ्या या वास्तुमुळे जालना शहराच्या वैभवात भर पडली आहे. नागरिकांना विविध आजारांच्या अत्याधुनिक आरोग्य सुविधा एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने अलीकडे अनेक तज्ज्ञ डॉक्टर हे एकत्र येवुन हॉस्पिटल सुरु करुन आरोग्य सेवा देत आहेत. राज्य शासन सर्वांसाठी आरोग्य मिशन घेवून पुढे जात आहे. याममाध्यमातूनच राज्य शासनाने देखील बहूतेक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले आहेत. याममुळे नागरिकांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगुन, आज लोकार्पण होत असलेल्या हॉस्पिटलला त्यांनी पुढील वाटचाली करीता यावेळी शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार अर्जून खोतकर यांनी जालना जिल्ह्यातील बॅरेजेस, जीएसटी आदी विविध प्रश्न मांडून, जिल्ह्यासाठी ज्या मागण्या केल्या त्याबाबत बैठक आयोजित करुन, सदर प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

महाकुंभमेळ्यात हिंदूंवर झालेल्या अत्याचारांसंबंधी चित्रप्रदर्शनाचे उदघाटन!

# बांगलादेश व काश्मिरी हिंदूंच्या समस्या सोडवण्यासाठी सर्व हिंदूंनी एकत्र येणे आवश्यक! - स्वामी कंजलोचन

**प्रयागराज । प्रतिनिधी -** महाकुंभमेळ्यासाठी ४० कोटींहून अधिक भाविक स्नानासाठी एकत्र येणार आहेत; मात्र आज आपल्याला बांगलादेश आणि काश्मिरी हिंदूंवर कसे अन्याय-अत्याचार होत आहेत, हे विसरता कामा नये. बांगलादेशात आज आपली मंदिरे आणि मूर्ती तोडल्या जात आहेत. ही समस्या सोडवायची असेल, तर बांगलादेश, भारत आणि विदेशातील सर्व हिंदूंनी एकत्र आले पाहिजे. तेव्हाच यावर उपाय काढता येईल. यासाठी हिंदु जनजागृती समितीने लावलेले काश्मीर आणि बांगलादेश येथील हिंदूंवरील अत्याचारांविषयीचे प्रदर्शन भाविकांनी नक्की पाहावे, असे आवाहन इस्कॉनचे वृंदावन धाम येथील श्री चंद्रोदय मंदिराचे स्वामी कंजलोचन कृष्णदास यांनी केले.



ते महाकुंभमेळ्यात हिंदु जनजागृती समितीच्या वतीने सेक्टर ६, कैलाशपुरी, भारद्वाज मार्ग येथे काश्मीर आणि बांगलादेश येथील हिंदूंवर कट्टरवादी आणि आतंकवाद्यांनी केलेल्या भीषण अत्याचारांविषयीच्या चित्रप्रदर्शन व ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या वेळी स्वामी कंजलोचन कृष्णदास, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, समितीचे उत्तर-पूर्व भारताचे मार्गदर्शक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांच्या शुभहस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी इस्कॉनचे स्वामी राधामोहन दास आणि समितीचे उत्तर प्रदेश व बिहार राज्य समन्वयक श्री. विश्वनाथ कुलकर्णी उपस्थित होते.

स्वामी कंजलोचन कृष्णदास पुढे म्हणाले, काश्मीर आणि बांगलादेश येथे हिंदूंवर काय होत आहे? इतर राज्यांतील हिंदूंची काय स्थिती आहे? याची महत्त्वपूर्ण माहिती या प्रदर्शनातील फलकांवरून मिळते. कुंभमेळ्यासाठी आलेल्या सर्व भाविकांनी हे प्रदर्शन जरूर पाहावे. तसेच 'सनातन धर्म काय आहे?' याची संपूर्ण माहिती या प्रदर्शनातून सहजपणे घेता येईल.

१९ जानेवारी १९९० रोजी आतंकवादामुळे काश्मिरी हिंदूंना काश्मीर सोडून विस्थापित होऊन ३४ वर्षे झाली आहेत. मात्र सरकार, न्यायालय आणि संसद असूनही विस्थापित हिंदूंचे काश्मीरमध्ये पुनर्वसन न होणे हा लोकशाहीचा पराभव आहे. या प्रदर्शनात काश्मीर आणि बांगलादेश येथे झालेला हिंदूंचा नरसंहार, साधुसंतांच्या हत्यांचे षड्यंत्र, लव्ह जिहाद, धर्मांतराची समस्या आणि उपाय, गोरक्षा, मंदिर संरक्षण, दंगलीच्या वेळी हिंदूंचे संरक्षण, देवतांचा सन्मान, अशा धर्मरक्षा कक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रजागृती कक्षामध्ये जिहादी आतंकवाद, राष्ट्रद्रोही हलाल जिहाद, राष्ट्रपतीचा सन्मान, स्वदेशी अस्मितेचे संवर्धन, सुराज्य अभियान यासंबंधी माहितीपूर्ण फलक प्रदर्शन असेल. हिंदु राष्ट्रासंबंधी आक्षेप व त्यांचे खंडन, संत व धर्मप्रचारकांचे मार्गदर्शन, शंकासमाधान, आणि हिंदूंना धर्माचरण करण्यास प्रेरित करणारे कक्ष प्रदर्शनात असतील, असे समितीचे श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांनी सांगितले.

# ध्येय निश्चित करा यश नक्की मिळेल - डॉ. सोमनाथ खाडे



**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांचे आयुष्यातील ध्येय निश्चित असेल तर यश नक्की मिळेल त्यासाठी अथक परिश्रमाची व योग्य दिशेने जाण्याची आवश्यकता असते असे मत डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले.

सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ तर्फे नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गोलापांगरी येथे दहावी बारावी नंतर पुढे काय कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की विद्यार्थी जीवन म्हणजे समुद्रातील जहाजासारखे आहे जहाजाला होकायंत्र नसेल तर दिशाहीन जहाज समुद्रात भटकत फिरते तसेच विद्यार्थ्यांचे ध्येय निश्चित नसेल तर आयुष्यभर भटकत फिरावे लागते.

जीवनात कितीही संघर्ष आला तरी तो संघर्ष आत्मविश्वासाने आपण संपवून पुढे जाऊ हा विश्वास तुम्हाला कधीच अपयशी ठरवणार नाही. त्यामुळे विद्यार्थी जीवन हे कोणत्याही संकटांना सहज दूर करणारे असते त्यासाठी योग्य मार्गदर्शन हे जीवनाला दिशा देते. दहावी बारावीनंतर विविध क्षेत्रांमध्ये अनेक संधी आहेत त्या संधीला अचूक हेरुन योग्य दिशेने वाटचाल केली पाहिजे त्यासाठी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करुन प्रामाणिकपणे चिकाटीने मेहनत घेतली म्हणजे यश नक्की मिळेल असा विश्वास डॉ. सोमीनाथ खाडे यांनी व्यक्त केला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी शासनाने राबवलेल्या सर्व योजना याची सविस्तर माहिती दिली. ठाकरे सरांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन भानुदास दोबाले यांनी केले. यावेळी अमर शिंदे, मोरे सर उपस्थित होते.


कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **प्रिती अशोक मुळे** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **प्रिती अशोक मुळे** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१२५) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (११६.१२) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (१४४६) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - रस्ता
पश्चिम - रस्ता
दक्षिण - आनंद शहा यांची जागा
उत्तर - अनिल गोयल यांची जागा
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (११६.१२) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **प्रभाकर बाबुराव हजारे** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **प्रभाकर बाबुराव हजारे** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. () भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (१११.५२) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२५६७/१५) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं. १४
पश्चिम - गट क्र, १५५ मधील भाग
दक्षिण - प्लॉट नं. १६
उत्तर - रस्ता
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (१११.५२) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **बाबुराव महादेव गायकवाड** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **बाबुराव महादेव गायकवाड** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१५५) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (१२०.८१) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२५६७/८९) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - ६.० मी. रस्ता
पश्चिम - सहान जागा
दक्षिण - प्लॉट नं ९०
उत्तर - प्लॉट नं. ८८
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (१२०.८१) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **मुंजा सदाशिव तायडे** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **मुंजा सदाशिव तायडे** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१४०) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (१०१.२०) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२६१८/११०,१११) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - रस्ता
पश्चिम - प्लॉट नं. १०८,१०९
दक्षिण - रस्ता
उत्तर - प्लॉट नं ११२
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (१०१.२०) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शिवहरी गोंविद गायके** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **शिवहरी गोंविद गायके** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१५५) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (१११.५२) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२५६७/८८) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - रस्ता
पश्चिम - सहान जागा
दक्षिण - प्लॉट नं. ८९
उत्तर - प्लॉट नं. ८७
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (१११.५२) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अर्जुन गुलाबराव गोरे** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **अर्जुन गुलाबराव गोरे** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१४०) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (९२.००) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२४३४/५७ असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं ६८
पश्चिम - रस्ता
दक्षिण - प्लॉट नं. ५६
उत्तर - प्लॉट नं. ५८
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (९२.००) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **उद्धव शामराव इंगळे** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **उद्धव शामराव इंगळे** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१५५) भुखंडाचे मोजमाप () भुखंडाचे क्षेत्रफळ (१२०.८१) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२५६७/८७) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - ६.० मी रस्ता
पश्चिम - सहान जागा
दक्षिण - प्लॉट नं. ८८
उत्तर - ६.० मी रस्ता
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (१२०.८१) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**



कार्यालय नगर पंचायत मंठा
जा.क्र/नपप/गुंठेवारी कक्ष/ २०२
दिनांक : / /२०२

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगर पंचायत, मंठा जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **गीता विशाल लखोटीया** रा. ता. मंठा जि. जालना यांनी आवश्यक दस्तऐवज जोडून नगर पंचायत मंठा कार्यालयाला नगर पंचायत मंठा हद्दीतील त्यांच्या मालकीचे भुखंड महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अन्वये नियमितीकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. श्री/श्रीमती **गीता विशाल लखोटीया** रा. मंठा जि. जालना यांच्या नावे प्राप्त असलेल्या प्रस्तावानुसार भुखंडाचा तपशील पुढील प्रमाणे गटनं/सर्वे नं. (१५८) भुखंडाचे मोजमाप (९.१४X१५) भुखंडाचे क्षेत्रफळ (२२८.५०) ज्याचा नगर पंचायत मालमत्ता क्र (२५६०/२) असा असून विषयांकित भुखंडाची चतुःसिमा
पुर्व - विक्रम महाजन यांचा प्लॉट
पश्चिम - पंजाब चव्हाण यांचा प्लॉट
दक्षिण - रस्ता
उत्तर - पंजाब चव्हाण यांचा प्लॉट
अशी आहे. या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र (२२८.५०) चौ.मी गुंठेवारी अधिनिमातील तरतुदीन्वये नियमित करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्ययास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात ०७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरसाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून गुंठेवारी नियमितीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**

# मंठा नगरपंचायतच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर - आमदार बबनराव लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा शहरामध्ये अनेक मूलभूत प्रश्न मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असून या सर्व प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून मंठा नगरपंचायतीच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहील मंठा शहराने मला भरभरून प्रेम दिले असून या प्रेमाचा उतराई होण्यासाठी तुम्ही सातत्याने मंठा शहरासह संपूर्ण तालुक्याच्या सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी प्रयत्नशील होतो आहे आणि यापुढे देखील राहील अशा शब्दात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या

मंठा नगरपंचायत येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ वंदनाताई वैजनाथराव बोराडे यांच्या नियुक्ती आणि त्यानंतर लगेचच संपन्न झालेल्या पदग्रहण समारंभ कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की आम्ही कधीही फोडाफोडीचे राजकारण केले नाही कोणत्याही पक्षाची व्यक्ती त्यांच्या वार्डाचा गावाचा शहराच्या विकासाच्या संदर्भाने प्रश्न घेऊन माझ्याकडे आल्यास मी सातत्याने तो कोणता पक्षाचा आहे याचा विचार न करता प्रामाणिकपणे त्यांना मदत करण्याचा पयत्न केला आहे आज सर्व पक्षाचे १७ पैकी १५ नगरसेवक एकत्र येऊन त्यांनी आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सौ. वंदनाताई वैजनाथ बोराडे यांच्या नावावर सहमती दर्शवत त्यांची नगराध्यक्षपदी निवड केली आहे.

भारतीय जनता पक्ष नेहमीच सबका साथ, सबका विकास... या तत्त्वाचे पालन करणारा पक्ष असून आम्ही कधीही कुठलाही जातिवाद केला नाही हिंदू मुस्लिम दलित सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन मागील ४० वर्षापासून आपण सातत्याने जनसामान्यांमध्ये काम करत आहोत त्यामुळे सर्वसामान्य जनतेने पाचव्यांदा मला पुन्हा आमदार पदी निवडून दिले. परंतु काही लोक मुद्दा म्हणून दलित आणि मुस्लिम बांधवांना भारतीय जनता पक्षापासून दूर करण्यासाठी फेक नरेटीव पसरवीत असतात या सर्व बाबींची प्रत्येकाने दखल घेऊन भारतीय जनता पक्ष सोबत जोडले जावे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

नगरपंचायत मंठा येथे आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ.वंदनाताई वैजनाथ बोराडे यांनी आज पदभार स्वीकारला निर्वाचन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तसेच मंठा नगरपंचायत चे मुख्याधिकारी श्री इंगोले यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण केली. मंठा शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये रस्ता वीज आणि पाणी या मूलभूत समस्या फार मोठ्या प्रमाणात होत्या या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी मंठा शहरासह तालुक्यातील प्रत्येक गावाला रस्ता, पाणी, वीज या समस्यांपासून मुक्त करत दर्जेदार रस्ते पिण्यासाठी शुद्ध पाणी व मुबलक वीज देण्याचा प्रयत्न केला असून मंठा तालुक्याने मताच्या रूपाने भरभरून प्रेम देत माझ्या कामाची पावती दिली आहे अशा शब्दात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या

मंठा शहरातील पाणीपुरवठा योजना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीगृह भव्य न्यायालयीन इमारत १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय ३२ कोटी रुपयांचे शहरांतर्गत रस्ते यासह तालुक्यात १३२ केव्ही ३३ केव्ही चे जाळे निर्माण केले आज मंठा तालुक्यातील प्रत्येक गाव वाडी वस्ती तांड्यापर्यंत डांबरीकरणाचा पक्का रस्ता निर्माण करण्यात आला असून सर्वसामान्य जनतेची दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे परतूर व मंठा वॉटर ग्रीडच्या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक गावाला पिण्याचे शुद्ध फिल्टर पाणी देण्याचा आपला संकल्प असून पुढील दोन-तीन महिन्यात तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये वॉटर ग्रीड चे शुद्ध पाणी पोहोचणार आहे. मंठा तालुक्यासह मतदारसंघातील संपूर्ण जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.



यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, वैजनाथ बोराडे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ.वंदना वैजनाथ बोराडे, नगरसेविका सौ नंदाताई राठोड, नगरसेविका सौ मीनाताई बोराडे, नगरसेविका सौ सरोजाताई बोराडे, नगरसेविका सौ शोभाताई बोराडे, नगरसेविका यमुनाताई दवणे, नगरसेविका सौ छायाताई वाघमारे, नगरसेविका इरमसबा रशीद खाटीक, नगरसेवक अचितराव बोराडे, नगरसेवक साजिद शेख, नगरसेवक बाज खा पठाण, नगरसेवक अशोक खंदारे, नगरसेवक दीपक बोराडे, नगरसेवक खय्युम बागवान, नगरसेवक विकास सूर्यवंशी यांच्यासह गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ, राजेश मोरे पंजाबराव बोराडे नागेशराव घारे सचिन बोराडे विलास घोडके नितीन राठोड प्रल्हादराव बोराडे प्रसादराव बोराडे नारायण दवणे जेके कुरेशी अरुण वाघमारे कैलासराव बोराडे उदय बोराडे आबासाहेब बोराडे मुस्तफा पठाण विठ्ठलराव काळे दत्तात्रय कांगणे रामकिसन बोडखे किशोर हनवते नवनाथ खंदारे प्रसादराव गडदे संजय गायकवाड सुनील कुलकर्णी प्रकाश मुळे, तोफिक कुरेशी सिद्धीकी बागवान शेख रहीम गणेशराव शहाणे दिनेश सराफ अमोल मोरे जयश्री पवार आशामती लहाने गणेशराव बोराडे प्रशांत वाढेकर कय्युम कुरेशी सिराज खान पठाण शबाब कुरेशी राजेभाऊ खराबे कबीर तांबोळी कैलास चव्हाण आबासाहेब सरकटे रावसाहेब बाहेकर अरुण खराबे भगवान सरकटे भगवान देशमुख राम प्रसाद जाधव श्रीनाथ वाढेकर खालेक पठाण सरस्वती वाघमारे जितेंद्र सरकटे शिवशंकर डोईफोडे माऊली गोंडगे आकाश राऊत नितीन सरकटे गजानन शिंदे द्वारकादास चिंचाने कपिल तिवारी वैभव नरवडे पांडुरंग चव्हाण नितीन चाटे बाबाजी जाधव लक्ष्मण बोराडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.